**अमरावती महानगरपालिका, अमरावती**

**दिनांक 29.11.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 120** - वाचन प्रेरणा दिनानिमित्व शोध प्रतिष्ठाण व अमरावती महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने मनपा शाळांमध्ये विविध स्पर्धा आयोजीत करण्याबाबत

**ठराव क्रमांक 120** - शोध प्रतिष्ठाण यांचे दिनांक 16.10.2023 रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे सदर पत्र सोबत संलग्न आहे. शोध प्रतिष्ठान व अमरावती महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जयंती निमित्य वाचन प्रेरणा दिन अंतर्गत मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, मेहंदी स्पर्धा इत्यादी स्पर्धा घ्यावयाच्या शोध प्रतिष्ठानचा मानस आहे असे नमुद आहे.

तसेच स्पर्धेतील विजेत्यांना विविध प्रकारची बक्षिसे आणि प्रमाणपत्र यासाठीचा लागणारा खर्च शोध प्रतिष्ठान मार्फत करण्यात येईल असेही नमुद आहे. दिनांक 17.10.2023 रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्राप्त पत्रानुमार शोध प्रतिष्ठान व अमरावती महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने विविध स्पर्धा मनपा स्तरावर घेण्याकरीता मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय शिक्षण समितीचा सभेचा आहे, साधारणसभेत सादर करण्यात आला आहे,परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजूर व कायम.

| | |
|---|---|
| **स्वा./-** | **स्वा./-** |
| **नगरसचिव** | **प्रशासक** |
| **महानगरपालिका, अमरावती** | **महानगरपालिका,अमरावती** |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.